आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

<u>ठळक बातम्या</u>

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज गयानाकडून ‘द ऑर्डर ऑफ एक्सलन्स’ हा सर्वोच्च सन्मान प्रदान

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी ६५ टक्क्यांहून अधिक मतदान, १९९५ नंतर पहिल्यांदा एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदारांचा उत्साह

- राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १० वी आणि १२ वीच्या परीक्षा ११ फेब्रुवारीपासून

- गोव्यात सुरू असलेल्या ५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात चित्रपट प्रेमींना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चित्रपटांची पर्वणी

<><><><>

प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी यांना आज गयाना देशातला सर्वोच्च सन्मान ‘द ऑर्डर ऑफ एक्सलन्स’ प्रदान करण्यात आला. मोदी यांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व, जागतिक पातळीवर विकसनशील देशांच्या हक्कांना त्यांनी मिळवून दिलेलं व्यासपीठ, आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या समुदायासाठी त्यांचं उल्लेखनीय कार्य आणि भारत-गयाना देशांमधले संबंध अधिक दृढ करण्यासाठीची त्यांची कटिबद्धता आदींसाठी मोदी यांना या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. गयानाच्या स्टेट हाऊस मध्ये आज एका समारंभात गयानाचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद इरफान अली यांच्या हस्ते मोदी यांना या पुरस्कारानं गौरवण्यात आलं. हा सन्मान दोन्ही देशातल्या नागरिकांमध्ये रुजलेल्या ऐतिहासिक संबंधांना समर्पित करत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. हा दौरा म्हणजे परस्पर देशातली मैत्री अधिक दृढ करण्याच्या भारताच्या कटिबध्दतेचा पुरावा असल्याचं ते म्हणाले. भारत-गयाना मधले संबंध सामायिक इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि उभय देशांचा परस्परांवरचा विश्वास यावर आधारित असल्याचं मोदी यांनी सांगितलं. भारत प्रत्येक क्षेत्रात गयाना ला बरोबरीनं साथ देण्यासाठी उत्सुक असून दोन्ही देशातले संबंध संपूर्ण सर्व विकसनशील देशांसाठी महत्वाचे असल्याचं मोदी यांनी यावेळी बोलताना अधोरेखित केलं.

<><><><>

विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून आतापर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार राज्यात ६५ टक्क्यांहून अधिक मतदान झालं. निवडणूक आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार आज रात्रीपर्यंत मतदानाची अंतिम टक्केवारी हाती येईल. त्यानुसार या टक्केवारीत आणखी १-२ टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच राज्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदान झालंय. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत ७१ पूर्णांक ६९ टक्के मतदारांनी मताधिकार बजावला होता.

राज्यात सर्वाधिक सव्वा ७६ टक्के मतदानाची नोंद कोल्हापूर जिल्ह्यात झाली. अहिल्यानगर, बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगोली, जालना, परभणी, सांगली, सातारा या जिल्ह्यांमध्येही ७० टक्क्यांपेक्षाही जास्त मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी ५२ टक्के मतदान मुंबई शहर या जिल्ह्यात नोंदवलं गेलं. मुंबई उपनगर जिल्ह्यात ५५ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. ठाण्यात ५६ टक्के मतदान झालं. हे ३ जिल्हे वगळता इतरत्र ६० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. मतदारसंघाचा विचार करता चिमूर आणि कागलमध्ये ८१ टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांनी मतदान केलं. राज्यातल्या २७ पेक्षा जास्त मतदारसंघात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी ४४ पूर्णांक ४९ टक्के मतदान कुलाबा मतदारसंघात झालं. अंबरनाथ, मुंबादेवी, धारावी आणि भिवंडी पूर्वमध्ये ५० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झालंय.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत कोल्हापूर जिल्ह्यात सर्वात जास्त मतदान नोंदवलं गेलं. मतदार जागृती करण्यासाठी प्रशासनानं पथनाट्य, पत्रकं, मॅरेथॉन सह अनेक उपक्रम राबवले आहेत. याबाबत कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन म्हणाले....

**<><><><><>**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीत कोल्हापूर जिल्ह्यानं आघाडी घेतली असली तरी गडचिरोली जिल्ह्यानं सर्व राज्याचं लक्ष वेधून घेतलं आहे. या जिल्ह्यात सत्तर टक्क्यापेक्षा जास्त मतदानाची नोंद करण्यात आली आहे. इथल्या जनतेला विकासाचं महत्त्व पटवून देण्यात आलं आणि बंदुकीच्या गोळीला मतदानानं उत्तर देण्याचं आवाहन त्यांना करण्यात आलं, त्यामुळे संदेशाचा सकारात्मक परिणाम दिसून आला, अशी माहिती इथल्या अधिकाऱ्यांनी दिली.

**<><><><><>**

ऐरोली विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत असलेले स्वराज्य पक्षाचे उमेदवार अंकुश कदम यांच्यावर काल कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. भाजपाचे माजी नगरसेवक शंकर मोरे यांचा मुलगा जयेश मोरे याला मारहाण केल्याची तक्रार मोरे यांनी केली होती. त्यावरून कदम यांच्याविरुद्ध आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

**<><><><><>**

धुळे शहरात मतदान यंत्र घेऊन जाणारे वाहन अडवून निवडणूक अधिकाऱ्याला धमकी देणाऱ्या तरुणासह ५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळ्यातल्या अभय कॉलेजजवळ काल ही घटना घडली होती.

**<><><><><>**

आजच्या म्हणजेच २१ नोव्हेंबर रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०५ जणांनी हौतात्म्य पत्करले होते. त्यांच्या या हौतात्म्याचे स्मरण म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईतल्या हुतात्मा स्मारकाला भेट देऊन शहीद हुतात्म्यांच्या स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही हुताम्यांना आदरांजली वाहिली.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या बारावी आणि दहावीच्या परीक्षेचं अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलं आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा पुढच्या वर्षी ११ फेब्रुवारी ते १८ मार्च तर दहावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १७ मार्च या काळात घेतली जाणार आहे. तत्पूर्वी बारावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी या काळात घेतली जाईल तर दहावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा ३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत होईल. परीक्षेचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक २१ नोव्हेंबरपासून राज्य मंडळाच्या www.mahasscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहे.

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या बोर्डाची परीक्षा १५ फेब्रुवारी पासून सुरु होणार असल्याची घोषणा आज सीबीएसईनं केली. दहावी बोर्डाच्या परीक्षा १८ मार्चला तर बारावीच्या परीक्षा ४ एप्रिल रोजी संपतील.

<><><><><>

गोव्यात ५५वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मोठ्या उत्साहात सुरु असून आज दिवसभरात विविध विषयांवरचे ४० चित्रपट दाखवण्यात येत आहेत. यामध्ये उत्तमोत्तम हिंदी आणि प्रादेशिक चित्रपट दाखवण्यात येत आहेत. इफ्फीमधील इंडियन पॅनोरमा या दालनाचेही उद्घाटन झाले असून यात २५ फिचर आणि २० नॉन फिचर चित्रपट दाखवण्यात येत आहेत. महोत्सवात चित्रपटांच्या प्रदर्शनाबरोबरच इतरही कार्यक्रम सुरु आहेत. जगभरातील चित्रपट कर्मी त्यांच्या मास्टरक्लासच्या माध्यमातून तरुणांना विविध विषयांवर मार्गदर्शन करत आहेत. चित्रपट निर्मिती उलगडून दाखवणारे विविध परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. इफ्फीमधील फिल्म बाजारचे हे १८ वे वर्ष असून चित्रपट निर्मितीत येणाऱ्या तरुणांना नामांकित व्यावसायिकांबरोबर संपर्क साधण्याची संधीही मिळालेली आहे.

<><><><><>

संत ज्ञानेश्वर माउली संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आळंदीमध्ये येत्या २३ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत कार्तिक वारी होणार आहे. २६ तारखेला कार्तिक एकादशी तर गुरुवारी २८ तारखेला माउलींचा संजीवन समाधी सोहळा आहे. यानिमित्त आळंदीमध्ये राज्याच्या तसंच देशाच्या कानाकोपऱ्यातून सुमारे सहा ते सात लाख भाविक दर्शनासाठी येतील असा अंदाज आहे. या काळात गर्दीचं नियोजन करण्यासाठी येत्या शनिवारपासून पुढचे आठ दिवस आळंदीत प्रवेश करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी करण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या दिंडीची वाहनं आणि अत्यावश्यक सेवा देणाऱ्या वाहनांना मात्र यातून वगळण्यात आलं आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त बापू बांगर यांनी दिली.

<><><><><>

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीवेळी मतदाराला धमकी दिल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना पुण्यातल्या स्थानिक न्यायालयाने समन्स बजावलं आहे. मत दिलं नाही तर गावचं पाणी बंद करू अशी धमकी पवार यांनी दिल्याची त्यांच्याविरोधात तक्रार आहे.

<><><><><>

राज्यात येत्या दोन दिवसात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केलं आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहणार असून आकाशही निरभ्र राहणार आहे. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तापमानात लक्षणीय घट झाली असून, विदर्भात काही ठिकाणी किंचीत घट झाली आहे.

<><><><><>